वर्ष १० वे विशेष अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि. २४ जुलै २०२५ पाने ४ किंमत ३

धनंजय मुंडेंच्या कार्यकाळात कृषी विभागातील खरेदीविरुद्ध याचिका, हायकोर्टाचा निर्णय

एक लाखांचा दंड सुनावला

बीड, (दिव्य न्युजल):- गेल्या काही महिन्यांपासून कोणत्या ना कोणत्या कारणाने वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या माजी कृषीमंत्री धनंजय मुंडेंच्या कार्यकाळातील कृषी साहित्याची खरेदी व वितरणाचे निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने वैध ठरवले आहेत .या निर्णयाला विरोध करणाऱ्या दोन्हीही याचिका न्यायालयाने फेटाळल्यात . या खरेदी वितरणाच्या निर्णयांवर खोटी याचिका दाखल करणाऱ्या याचिका करतात तुषार पडगिलवार एक लाखाचा दंड ठोठावलाय .

Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

न्यायमूर्ती अलोक आराधे व संदीप व्ही. मर्णे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे . तत्कालीन कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या धनंजय मुंडे यांनी राज्य मंत्रिमंडळाची रीतसर मान्यता घेऊनच हा निर्णय घेऊन सदर प्रक्रिया राबवली असल्याचं मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केलं .मुंबई उच्च न्यायालयानं धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात कृषी विभागात करण्यात आलेल्या खरेदीबाबत दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर सुनावणी घेतली. न्यायालयानं या खरेदीत कोणताही नियमभंग झाल्याचे आढळले नाही, असं स्पष्ट करत दोन्ही याचिका फेटाळल्या. तसेच खोटी आणि बिनबुडाच्या तक्रारीद्वारे न्यायालयाचा वेळ वाया घालवल्याबद्दल याचिकाकर्ता तुषार पडगिलवार याच्यावर १ लाख रुपयांचा दंड ठोठावला.

▸▸ पान २ वर

तोंडाला उंदीर बांधून करा वाल्मिक कराडची चौकशी

महादेव मुंडेंची पत्नी ज्ञानेश्वरी यांची मागणी

बीड , (दिव्य न्युज):- महादेव मुंडे यांचा शवविच्छेदन अहवाल पाहून बुधवारी त्यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी संताप व्यक्त केला. एवढे क्रूरपणे मारूनही प्रशासन आरोपींची पाठराखण करत आहे. पोलिस अधीक्षकांना न्याय द्यायचा असेल तर वाल्मीक कराडला पीसीआरमध्ये घेतले पाहिजे. कराडच्या तोंडाला उंदीर बांधून त्याची चौकशी करावी, अशी मागणी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बुधवारी केली. २१ ऑक्टोबर २०२३ रोजी महादेव मुंडे यांचा खून झाला. अजूनही आरोपी निष्पन्न नाहीत. महादेव मुंडे यांचा गळा कापून

▸▸ पान २ वर

नगर पालिकेत गुत्तेदारांना तिकिट देणार नाही-आ.संदीप क्षीरसागर

बीड , (दिव्य न्युज):- शरद ज्यांच्याकडे आपले उपजीविकेचे स्वतःचे साधन असेल अशा लोकांना बीड नगरपालिकेचे तिकीट मिळेल. जे नगरपालिकेच्या गुत्तेदारीवर जगतात आणि आपली सर्व कामे नगरपालिकेच्या जीवावर पूर्ण करतात अशा लोकांना आपल्या पक्षाकडून तिकीट देणार नाही पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी नागरिकांशी बोलताना व्यक्त केले. संदीप क्षीरसागर विजेचा प्रश्न सोडवण्यासाठी सहयोग नगर परिसरातआले होते. यावेळी नागरिकांच्या बैठकीत ते बोलत होते. अनौपचारिक बैठकीत बोलतानां संदीप क्षीरसागर म्हणाले की नगरपालिकेत सध्या सावळा गोंधळ चालू आहे. यांच्याकडे घंटागाडीसाठी डिझेल ला पैसे नसतात. मात्र गुत्तेदारांच्या चार चाकी गाड्या जोरात चालतात. हे कोणाच्या जीवावर चालते जर नगरसेवक आणि पदाधिकारीच नगरपालिकेत नियत्रण चालू आहे. गुत्तेदारी करत असतील तर नगरपालिका चालणार कशी? सद्यस्थितीत तर नगरपालिक प्रशासनावर कोणाचेही नाही. त्यामुळे मनमानी नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही सकाळी सहा वाजल्यापासून शहरात फिरतो नाल्य सफाई, लाईट, पाणी या प्रश्नासाती सातत्याने उभे राहतो. नागरिकांना सर्व सुविधा वेळेत मिळाव्यात म्हणून

▸▸ पान २ वर

लोढाने तोंड उघडू नये म्हणून कोठडीत ठेवलंय, नाहीतर महाजनांचा पर्दाफाश होईल

मुंबई , (दिव्य न्युज):- राज्यात सध्या हनी ट्रॅपचं प्रकरण चांगलच गाजत आहे. त्यात जळगावचे प्रफुल्ल लोढा याप्रकरणात मुंबई पोलिसांच्या अटकेत आहे. त्यावरुन राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते एकनाथ खडसे व भाजपचे मंत्री गिरीश महाजन या दोघांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. एकनाथ खडसे यांनी गिरीश महाजन यांच्यावर आणखी एक गंभीर आरोप केला आहे.

खडसे यांनी म्हटलं आहे की, प्रफुल्ल लोढा याच्याकडे असलेले पुरावे व मटेरिअल त्यांनी इतरांना देऊ नये आणि तोंड उघडू नये यासाठी त्यांना वारंवार पोलिस कोठडीत ठेवण्याचा प्रयत्न केला जातो आहे. प्रफुल्ल लोढा जर जामिनावर बाहेर आलेत व

▸▸ पान २ वर

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी पोहोचले बाबा ताजुद्दीन यांच्या दर्ग्याला

मुंबई , (दिव्य न्युज):- सूफी संत बाबा ताजुद्दीन यांचा वार्षिक ऊर्स ताजाबाद शरीफ येथे मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. यानिमित्त हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट कार्यालयातून दरबारी शाही संदल मंगळवारी काढण्यात येणार आहे. संदल ताजाबादच्या बुलंदद्वार येथून निघाल्यानंतर उमरेड रोड, शीतला माता मंदिर, सक्करदरा चौक, अशोक चौकपासून महाल, इतवारी, गांधीबागच्या ज्या मार्गावरुन बाबा ताजुद्दीन आपल्या जीवनकाळात फिरले त्या मार्गाने फिरविण्यात येईल.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी संत हजरत बाबा ताजुद्दीन यांच्या १०३ व्या उर्सनिमित्त आयोजित उत्सवाला मोठा ताजबाग येथे रविवारी रात्री उशिरा भेट दिली. 'संत ताजुद्दीन बाबा यांचा आशीर्वाद घेण्यासाठी नागपुरात येतात. या परिसराचे सौंदर्यीकरण झाले, मात्र आता गोरगरीब रुग्णांच्या उपचारासाठी एक मोठे हॉस्पिटल व्हावे अशी इच्छा आहे,' अशी भावना गडकरी यांनी व्यक्त केली.

हजरत बाबा ताजुद्दीन यांचा १०३ वा वार्षिक उरूस शुक्रवार १८ जुलैपासून सुरू

▸▸ पान २ वर

नशेच्या गोळ्या विक्री प्रकरण : मेडिकल चालकासह दोघांना अटक, अटकेतील आरोपींची संख्या सहावर

बीड, (दिव्य न्युज):- बीड शहर डीबी पथकाने नशेच्या गोळ्यांची विक्री करणाऱ्या रॅकेटवर पुन्हा एकदा कारवाई करत दोन जणांना अटक केली आहे. अटकेत आलेल्यांमध्ये एका मेडिकलचे चालक व त्याला गोळ्या पुरवणारा तरुण यांचा समावेश आहे.

पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी नशाखोरीविरोधात कडक कारवाईचे आदेश दिल्यानंतर बीड शहर पोलिसांकडून गेल्या काही महिन्यांपासून विशेष मोहिम राबवली जात आहे. याअंतर्गत दोन महिन्यांपूर्वी चार जणांना अटक करत सुमारे साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. अटक करण्यात आलेले सर्व आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

▸▸ पान २ वर

मध्यरात्री पकडला नेकनूरमध्ये लाखोंचा गुटखा

नेकनूर, (दिव्य न्युज):- मागील काही दिवसांपासून अवैध धंद्यावर निर्बंध आले असले तरी गुटख्याची विक्री मात्र तेजीत सुरु होती. (बीड) शहरात आणि गल्लीबोळात ही टपऱ्यावर गुटखा आरामात मिळत असल्याचे चित्र असताना मध्यरात्री १ च्या सुमारास धुळे-सोलापूर हायवेवरील वानगाव शिवारात नेकनूर पोलिसांनी लाखोंचा गुटखा ताब्यात घेतला आहे. रजनीगंधा, बाबा आणि विमल कंपन्याचा

▸▸ पान २ वर



उघड्यावरील अन्न पदार्थांची सर्रास विक्री

नागरीकांच्या आरोग्याशी खेळ, अन्न व औषध प्रशासन विभाग निद्रावस्थेत

बीड , (दिव्य न्युज):- भेसळयुक्त पदार्थांची विक्री सर्रासपणे होत असून, प्रामुख्याने दूध, दुग्धजन्य पदार्थ, आणि तत्सम खाद्य पदार्थांची विक्री होत आहे. नागरिकांच्या आरोग्याचा खेळखंडोबा होऊन मोठ-मोठे आजार बळावण्याची चिंता असते. यावर अंकुश ठेवण्याची जबाबदारी ही जिल्ह्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाची असते. मात्र, अन्न व औषध प्रशासन विभाग नावालाच असल्याचे बोलल्या जात आहे.

तालुक्यात शहर असो वा ग्रामीण भाग असो. यामधे छोटे मोठे हॉटेल, खानावळी, नाश्ता, रेस्टॉरंट तसेच सर्रासपणे दूध, दही, तूप, लोणी, पनीर तसेच दुग्धजन्य पदार्थामधे भेसळ करून विक्री करत असल्याचे निदर्शनास येत आहे. काही विक्रेत्यांकडून बनावट खवा,

▸▸ पान २ वर

खाद्या पदार्थांमध्ये भेसळ केल्यामुळे पावसाळयाचे दिवस असल्याने नागरीकांचे आरोग्य लवकर बिघडते. भेसळ झाली किंवा नाही याची तपासणी करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाची आहे. परंतु बीड शहरातील कुठेच कार्यवाही होतांना दिसत नाही.

हाजी महेबुब खान
कार्यकर्ते, बीड

ज्ञानराधात ३५०० कोटींची फसवणूक

औरंगाबाद खंडपीठाची केंद्र, राज्य सरकार, ईडीला नोटीस

बीड, (दिव्य न्युज):- देशभरातील नागरिकांच्या गुंतवणूक केलेल्या रकमेत सुमारे ३५०० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याच्या प्रकरणात बीड वैधील ज्ञानराधा मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीविरुद्ध याचिका दाखल झाली आहे. या प्रकरणी सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. मनीष पितळे व न्या. वाय. जी. खोब्रागडे यांनी केंद्र आणि राज्य शासन, सक्तवसुली संचालनालय (ईडी) आणि अवसायकांना नोटीस बजावण्याचा आदेश दिला आहे. या याचिकेवर ३ आठवड्यानंतर पुढील सुनावणी होईल.

काय आहे प्रकरण?

याबाबत ११ याचिकाकर्त्यांनी ॲड. युवराज बारहातें व ॲड. रंजिता बारहाते (देशमुख) यांच्यामार्फत याचिका दाखल केली आहे. त्यात म्हटल्यानुसार, ज्ञानराधा या सोसायटीने १३ ते १८ टक्के व्याजाचे आमिष दाखवून देशभरातील सुमारे ६ लाख लोकांना गुंतवणुकीसाठी आकर्षित केले. आतापर्यंत सुमारे ३,५०० कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आला. अनेक ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत.सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत सुमारे १,४३३.४८ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. महाराष्ट्र ठेवीदार हितसंरक्षण परभणीच्या अधिनियमांतर्गत जिल्हाधिकाऱ्यांनीही सोसायटीची मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. केंद्रीय निबंधकांनी ज्ञानराधा सोसायटीवर अवसायक (लिक्विडेटर) म्हणून बीडच्या जिल्हा उपनिबंधकांची नेमणूक केली आहे.

याचिकाकर्त्यांची विनंती

ठेवीदारांच्या दाव्यांची त्वरित तपासणी व आणि स्थावर मालमत्ता विकून मिळालेले पैसे पडताळणी करण्याचे, सोसायटीची जंगम ठेवीदारांना तत्काळ वितरित करण्याचे आणि ठेवीदारांचे दावे निकाली निघेपर्यंत इतर कर्जदारांकडे निधी वळवू नये, असे निर्देश अवसायकांना द्यावेत, अशी विनंती याचिकाकर्त्यांनी केली आहे.ईडी आणि एमपीआयडी कायद्यांतर्गत जप्त केलेल्या सर्व मालमत्ता अवसायकांकडे हस्तांतरित करण्याचे निर्देश द्यावेत, जेणेकरून मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, २००२ अंतर्गत त्यांची योग्यरीत्या विल्हेवाट लावून ठेवीदारांना पैसे परत करता येतील.या घोटाळ्याची व्याप्ती अनेक राज्यांमध्ये असल्याने केंद्रीय अन्वेषण विभागाकडे चौकशी सोपवावी. ठेवीदारांना त्यांचे हक्काचे पैसे व्याजासह तीन महिन्यांच्या आत परत मिळण्याचे आदेश देण्याची विनंती केली आहे.

मुख्यमंत्र्यांनीही घेतली बैठक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ज्ञानराधा सोसायटीत गुंतवणूक केलेल्या ठेवीदारांची रक्कम मिळावी, यासंदर्भात १४ जुलै रोजी बैठक घेतली होती. संस्थाचालकांची मालमत्ता लवकर जप्त करून ठेवीदारांचे पैसे परत देण्यात यावेत, अशी भूमिका यावेळी मुख्यमंत्र्यांनी मांडली होती. तीन लाख ७० हजार ठेवीदार आणि खातेदारांचे कोट्यवधी रुपये अडकले आहेत. या प्रकरणात या पतसंस्थेवर अनेक शहरांत गुन्हे दाखल झाले आहेत

बसच्या धडकेत पती-पत्नीचा जागीच मृत्यू

पाटोदा (दिव्य न्युज):- येथील शहिद चौकातून दुचाकीवर जात असलेल्या पती-पत्नीला चौकातील बॅनरमुळे एसटी वाहन चालकाला दुचाकी न दिसल्याने झालेल्या भिषण अपघातात घाटेवाडी येथील पती-पत्नीचा जागीच मृत्यु झाल्याची घटना गुरुवार (दि.२४) रोजी दुपारी घडली.

पाटोदा येथील रोहतवाडी परिसरातील घाटेवाडी येथील बाळू केशव वायकर व लता बाळू वायकर हे पती पत्नी ग्रामीण रूग्णालय पाटोदा येथून शहिद चौक मार्गे जात असतांना एसटी क्रमांक एम.एच.१४.एन.एक्स. ८९६२ ही नांदेड डेपोची बस पाटोद्यावरून मांजरसुंब्याकडे जात असतांना शहरातील शहिद चौकात लावलेल्या बॅनरमुळे समोरून येणाऱ्या दुचाकीचा अंदाज न आल्यामुळे घाटेवाडी येथील वायकर दांम्पत्य झालेल्या अपघातात जागीच ठार झाल्याची घटना घडली.

पान १ वरून

एक लाखांचा

धनंजय मुंडे यांच्या कृषीमंत्री कार्यकाळात कृषी विभागाने केलेल्या साहित्य खरेदीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत काही याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. या याचिकांमध्ये आरोप करण्यात आला होता की, खरेदी प्रक्रियेमध्ये नियमांचे उल्लंघन झाले असून यामध्ये अपारदर्शकता होती. मात्र या प्रकरणावर सुनावणी घेतल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने सरकारच्या आणि कृषी विभागाच्या भूमिकेस मान्यता दिली आहे.

याचिकाकर्त्यांची खोटी भूमिका उघड

विशेष म्हणजे स्प्रेयर निर्माते तुषार पडगीलवार यांनी स्वतःच्या खाजगी हितासाठी प्रथम मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली, पण निर्णय विरोधात जाईल हे लक्षात येताच त्यांनी मुख्य मागण्या मागे घेतल्या. त्यानंतर त्यांनी नागपूर न्यायालयात जनहित याचिकेच्या नावाखाली काही शेतकऱ्यांना पुढे करत खोटे बिल्स व खोटे पुरावे दाखवून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. यावरही न्यायालयाने भाष्य केले आहे. या निर्णयामुळे राज्य शासनाच्या कृषी उत्पन्नवाढीच्या विशेष कृती आराखड्याला न्यायालयीन मान्यता मिळाली आहे. तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी राबवलेली ही थेट खरेदी प्रक्रिया पारदर्शक व शेतकऱ्यांच्या हितास पूरक असल्याचे निकालात नोंदवले आहे.

तोंडाला उंदीर बांधून

त्यांच्यावर हत्याराने १६ वार केल्याचे अहवालातून समोर आले.

ज्ञानेश्वरी मुंडे यांनी काही धक्कादायक गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. कराडच्या लहान मुलाने वाहनात बसताना 'मला महाद्याचा काटा काढायचाय' असे सांगितल्याचे बाळा बांगर म्हणतात. अजूनही कराडचा मुलगा म्हणतोय मी जिवंत आहे. त्यामुळे त्याच्या बापाला आधी शिक्षा झाली पाहिजे. याप्रकरणी वाल्मीक कराड, श्री कराड आणि भावड्या कराड यांनाही आरोपी करावे, अशी मागणी ज्ञानेश्वरी यांनी केली.

१२ गुंठ्यांसाठी वाद

या हत्येमागे १२ गुंठे जमिनीचा वाद असल्याचेही ज्ञानेश्वरी मुंडे यांनी सांगितले. ज्या १२ गुंठ्यांसाठी वाद झाला, ती जागा वाल्मीक कराडचा निकटवर्तीय भावड्या कराडच्या नावावर आहे. त्यामुळे तो देखील यात आरोपी झाला पाहिजे, अशी मागणी ज्ञानेश्वरी यांनी केली.

नगर पालिकेत

आमचा प्रयत्न असतो. आम्ही लोकांसाठी कायम रस्त्यावर असतो. मात्र ज्यावेळी मतदान करायची वेळ येते त्यावेळी मग धर्म, जात, पक्ष सर्वच गोष्टी आठवतात आणि काम करणाऱ्यांना लोक विसरून जातात. यावेळी जर आम्हाला एक मुखी सत्ता दिली तर नगरपालिका सुतासारखी सरळ होईल. नगरपालिके मध्ये कोणत्याही नगरसेवकाची गुत्तेदारी चालू देणार नाही. ज्या लोकांची उपजीविका आपले व्यवसाय आणि इतर उद्योग धंद्यावर आहे.

अशा लोकांना नगरपालिकेमध्ये मेदवारी दिली जाईल. सर्वसामान्य जनतेमध्ये ज्या लोकांना मान आहे. अशाच लोकांना उमेदवारी दिली जाईल. जे लोक कायम लोकांमध्ये राहन त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी झटत असतात त्यांनाच उमेदवारी दिली जाईल. शेवटी आपला प्रतिनिधी आपल्या कामासाठी असतो तो जर आपल्या कामाला येत नसेल आणि स्वतःची तबडी भरत असेल तर असे लोक काय कामाचे? आम्ही माजलगाव बँक वॉटरचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी रात्रंदिवस एक केले बीडला पाणी मिळावे यासाठी प्रयत्न केले. मात्र केवळ ब्लिचिंग पावडर नाही म्हणून चार-चार दिवस उशिरा पाणी मिळत असेल तर नगरपालिका प्रशासन कसे चालते हे स्पष्ट होते. सध्या नगरपालिका प्रशासनावर अधिकाऱ्यांची मनमानी चालू आहे. ज्यावेळी लोकप्रतिनिधी नगरपालिकेवर सत्तारूढ होतील त्यावेळी सर्व बाबी सुरळीत होतील. जर शहराने आम्हाला एक मुखी सत्ता दिली तर प्रशासनालाही सुतासारखे सरळ करू. सध्या कचरा उचलण्यासाठी घंटा गाड्या नाहीत आम्ही पालकमंत्र्यांकडे शंभर घंटा गाड्यांची मागणी केली आहे. कचरा उचलण्यासाठी कर्मचारी नाहीत. आगामी काळात जास्तीत जास्त कर्मचारी भरती केले जातील. जेणेकरून शहरांमध्ये कचऱ्याचा प्रश्न उद्भवणार नाही. सहयोग नगर भागामध्ये कचऱ्याचे ढिगारे पडतात या भागातील दवाखाने आणि हॉटेल चालकांनी स्वतःचा कचरा स्वतः जमा करावा ही त्यांची जबाबदारी आहे. मात्र बोलत कोणीच नाही. सहयोग नगर परिसरात जे पावसाळ्यात घरामध्ये पाणी शिरते त्याचे मूळ जालना रोडच्या नाली मध्ये आहे. जोपर्यंत ही नाली सरळ होत नाही आणि शहराचे पाणी जालना रोड मार्गे बिंदूसराकडे जात नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही तसाच प्रश्न भाजी मंडई चाही आहे भाजी मंडई मध्ये दूर वरून पाणी येते पूर्वीही हे पाणी विद्यानगर भागातून नदीकडे जायचे मात्र आता हे पाणी बंद झाले आहे. त्यामुळे सर्व पाणी भाजी मंडई कडे येते. हा एक प्रश्न सोडवण्यासाठी आपण प्रयत्न करू शेवटी नागरिकांना त्रास होणार नाही यासाठी लोकप्रतिनिधी असतात. त्यांनी लोकांसाठी काम केले पाहिजे. जे आम्ही सातत्याने करत आहोत. माझ्यासोबत माजी आमदार सय्यद सलीम हेही सातत्याने प्रश्न सोडवण्यासाठी मार्गदर्शन करतात. ते स्वतः प्रयत्न करतात त्यांना शहराची संपूर्ण जाण आहे. शहराचे प्रश्न काय आहेत आणि ते कसे सोडवले जातील यासाठी त्यांचे अनमोल मार्गदर्शन होते. नागरिकांनीही काम करणाऱ्यांना निवडून दिले पाहिजे असे यावेळी संदीप क्षीरसागर म्हणाले या अनौपचारिक बैठकीला सहयोग नगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांनी काम करणाऱ्यांना निवडून देऊ अशी ग्वाही दिली.

लोढाने तोंड उघडू नय

त्यांच्याकडून सत्य निघाल्यास या प्रकरणाचा पर्दाफाश होईल..असा दावा करत त्यांनी गिरीश महाजन यांच्यावर निशाणा साधला आहे.

प्रफुल्ल लोढा याच्याकडून काही मिळण्यापेशा त्याच्याकडे जे मिळेल ते नष्ट करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्याच्याकडून काहीतरी मिळेल म्हणून त्याला छळलं जात आहे. लोढाकडून यांना पुरावे घ्यायचे आहेत व ते पुरावे नष्ट करायचे आहेत असा माझा सरळ आक्षेप असल्याचे खडसे म्हणाले. लढायचे असेल तर आमने-सामने येऊन लढा असे आव्हान खडसेंनी महाजन यांना दिले आहे. ते म्हणाले, मी जे काही करतो ते उमद्या मनाने करतो. मी मागून काड्या करणारा माणूस नाही. तसेच याला जेलमध्ये टाका, याच्या मागे ईडी लावा असेही करणाऱ्यातला मी नाही असा टोला खडसेंनी महाजनांना लगावला आहे.

खडसे पुढे म्हणाले, प्रफुल्ल लोढा हा सातत्याने गिरीश महाजन यांच्या बंगल्यामध्ये राहायचा आणि याचा पुरावा देण्याची गरज नाही ते कुणीही सांगेल. तसेच मी असे कधीही म्हटले नाही की मला लोढा भेटलेला नाही. मी पहिल्यांदाच सांगितले होते की, माझा सुद्दा लोढा सोबत फोटो असू शकतो. घटना घडली ती तारीख आणि प्रफुल्ल लोढावर साकीनाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाली ती तारीख यात पंधरा दिवसांचे अंतर आहे. पंधरा दिवस गुन्हा दाखल करण्यासाठी का लागले? असा सवाल खडसेंनी उपस्थित केला. नाशिकच्या हनी ट्रॅप प्रकरणात कोण कोण आहे, त्याचे मुळ शोधणं हा माझा विषय आहे. मी त्या पर्यंत लवकरच पोहचेल आणि शेवटपर्यंत नक्कीच जाईल असा विश्वास खडसे यांनी व्यक्त केला.

दरम्यान लोढाच्या वक्तव्याचा दाखला देत महाजन यांनी खडसेंच्या मुलाच्या मृत्यूबाबत चौकशी संदर्भात विधान केलं होतं. त्यावर खडसे म्हणाले, आता जर तुझ्यात खऱ्या अर्थाने हिम्मत असेल, तुझी तेवढी पत असेल तर माझ्या मुलाच्या खुनाची चौकशी कर असे खुले आव्हान महाजन यांना खडसेंनी दिले आहे. माझ्या मुलाच्या खुनाची चौकशी आत्महत्येची तसेच खुनाशी चौकशी सीबीआयच्या माध्यमातून करा मी तयार आहे असं खडसे म्हणाले.

केंद्रीय मंत्री नितीन

झाला आहे. यानिमित्त ताजुद्दीन बाबांवर श्रद्धा असलेले लाखो भाविक नागपुरात आले आहे. ताजबाग येथून मंगळवारी (२२ जुलै) शाही संदल निघणार आहे. शाही संदल ज्या मार्गाने प्रस्थान करेल तो ताजबागचा रस्ता सक्करदरा चौक ते दिघोरी चौक वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद केला जाणार आहे.मिरवणुकीत वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून, या मार्गावरची सर्व प्रकारची वाहने पर्यायी मार्गावर वळवली जाणार आहेत. संदल मिरवणुकीदरम्यान तीनगल चौक ते शहीद चौक एकेरी वाहतूक करण्यात येणार आहे. या मार्गावर संदल मिरवणूक व दुचाकी वाहने सोडून इतर सर्व वाहनांना प्रवेश बंद राहील. बंद केलेल्या मार्गावरील वाहतूक आवश्यकतेनुसार पर्यायी मार्गावर वळवण्यात येत आहे.

संबंधित चौक येणारी वाहतूक ही वेळेनुसार इतरत्र पर्यायी मार्गावर वळवण्यात येईल. आवश्यकतेनुसार इतरत्र वाहतूक वळवण्याचे अधिकार वाहतूक शाखा पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त लोहित मतानी यांनी जारी केलेल्या परिपत्रकातून स्पष्ट केले.

नागपूरकडून उमरेडकडे जाणाऱ्या बसेस व इतर वाहतूक बैद्यनाथ चौक, मेडिकल चौक, क्रीडा चौक, तुकडोजी पुतळा चौक, मानेवाडा चौक, म्हाळगीनगर चौक, चामट चक्की चौक मार्गे उमरेड रोडचा वापर करतील.उमरेड मार्गाकडून नागपूर शहरात येणारी वाहतूक दिघोरी नाका, चामट चक्की चौक डावे वळण घेऊन वळणरस्ता म्हाळगीनगर, मानेवाडा चौक, तुकडोजी पुतळा, मेडिकल, बैद्यनाथ चौक मार्गे वळवली जाईल.बॉलीवूड सेंटरकडून चक्रधरनगर बगीचा, भांडे प्लॉट चौकाकडे जाणारी वाहतूक बंद करून ती छोटा ताजबाग चौक, सक्करदरा चौक, तिरंगा चौक, गुरुदेव नगर चौक मार्गे वाहतूक वळवली जाईल. गुरुदेवनगर चौकतून भांडे प्लॉट चौकाकडे जाणारी वाहतूक तिरंगा चौक, सक्करदरा चौक, छोटा ताजबाग मार्ग जातील.

नशेच्या गोळ्या विक्री

या प्रकरणाच्या पुढील तपासात इस्मालमपूरा येथील शेख फारुक शेख आरेफ याने अल्फ्राझोलम गोळ्यांची विक्री केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता, त्याला या गोळ्यांचा पुरवठा शहेंशाहर नगर येथील इनामदार मोहम्मद तारीखोद्दीन मोहम्मद नुरुद्दीन याच्याकडून होत असल्याचे उघड झाले. त्यालाही पोलिसांनी अटक केली असून, या गुन्ह्यातील एकूण आरोपींची संख्या आता ६ वर पोहोचली आहे.

ही यशस्वी कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, सपोनी बाबा राठोड आणि पोलिस अंमलदार सचिन अलगट, संजय राठोड, गहिनीनाथ बावनकर, राम पवार यांच्या पथकाने केली. बीड शहर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

मध्यरात्री पकडला

आणि विमल कंपन्याचा हा गुटखा असल्याची माहिती आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांना आयशर टेम्पोतून गुटखा येतं असल्याची माहिती मिळाल्यानंतर मध्यरात्री १ च्या सुमारास सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. यावेळी एक स्विफ्ट कार ही पोलिसांनी ताब्यात घेतली असून यात २० लाख ७१ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणाचा पुढील पोलीस तपास सुरु असून या कारवाईमुळे गुटखा तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

उघड्यावरील अन्न

रबडी व मिठाई विकली जात असून, त्यामध्ये आलुवा किस, काशी फळाचा गर अशा घटकांचा वापर करून वजन वाढवले जात असल्याची खात्रीलायक माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाकडून केवळ औपचारिक तपासणी होते ग्रामीण भागातील दुकाने, पदार्थ तयार करणारे उद्योग, मिष्ठान्न विक्रेते यांच्याकडे तपासणीसाठी अधिकारी फिरकत नाहीत. फिरकले तर त्यांच्यावरआजपर्यंत कारवाई झाल्याचे निदर्शनास आले नसल्याने संबंधित विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह निर्माण होते आहे. त्यामुळे संबंधित विभागाने ही बाब नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने गांभीयनि घेणे आवश्यक आहे. तालुक्यात कुठे अन्न व औषध प्रशासन विभागाने ठोस कारवाई केल्याचे दिसत नाही. यावर सारे काही दुर्लक्ष हे जाणीवपूर्वक होत असल्याची चर्चा आता जिल्हाभरात होत आहे. त्यामुळे झोपेचे सोंग घेणाऱ्या अन्न व औषध प्रशासन विभागाने याकडे गांभीयनि घेण्याची गरज आहे.

ही आहेत मुख्य कर्तव्य

अन्नपदार्थामध्ये भेसळ होणार नाही, अर्थातच अन्नाची सुरक्षा अबाधित राहण्यासाठी अन्न उत्पादने आणि विक्रीसाठी असलेल्या नियमांचे पालन केले जाते की नाही हे तपासण्याची देखील जबाबदारी अन्न व औषध प्रशासन विभागाची आहे. औषध सुरक्षा औषधे सुरक्षित आणि प्रभावी आहेत की, नाही हे तपासणे तसेच, औषध कंपन्या नियमांनुसार काम करत आहेत की, नाही हे देखील तपासले जाते.